Municipal Corporation of Greater mumbai

# परिमंडळ- १

# नगर पथविक्रेता समिती

## बैठक क्र.१

## दि.१६.०८.२०१८

**खालील नमूद <u>क्षेत्र 'ना फेरीवाला क्षेत्र</u>' म्हणून निर्देशित केली आहेत :**

- महानगरपालिका मंडई , रुग्णालय, रेल्वे स्थानक, बस स्थानक यांच्या पासून १५० मी. पर्यंत
- शैक्षणिक संस्था व धार्मिक स्थळापासून १०० मी. मात्र धार्मिक स्थळाच्या परिसरात पूजा, अर्चा, साधना करण्याकरीता आवश्यक ते साहित्य विकण्याकरीता पुरेशी जागा आरक्षित करावी.
- उच्च न्यायालय, न्यायालय, भारत सरकार, महाराष्ट्र शासन यांची महत्वाची कार्यालये व इतर महत्वाच्या संस्थेसमोरील पदपथ.
- चौकाच्या मध्यबिंदू पासून ५० मी. क्षेत्र.
- रस्त्याच्या वळणावर, रस्त्याच्या मध्यबिंदूपासून दोन्ही बाजूस ५० मी.
- वाणिज्य आस्थापना, निवासी संकुल, निवासी इमारतीचे प्रवेशद्वार.
- कमी वाहन क्षमता असलेले रस्ते (ना फेरीवाला क्षेत्रामधील)
- १० फुटापेक्षा कमी रुंदी असलेले पदपथ.

मा. उप आयुक्त (फे.नि) यांच्या परिपत्रक क्र.उप आयुक्त / फे.नि/११५४ दि.०८.०९.२०१५ अन्वये सदर बैठ्या जागा निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे निर्देशिले आहे.

- पदपथाच्या / रस्त्याच्या एका बाजूला. one side.
- रस्त्याचे शेवटचे टोक. Dead end
- नाल्याशेजारील मोकळ्या जागा. Nullah - empty space.
- अशा इतर जागा ज्यामुळे पदचारी व वाहतुकीस अडथळा येणार नाही.
- महानगरपालिकेकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या मार्केटची आरक्षणे. no obstruction.
- रहिवाशी संकुलाच्या हद्दी मधील मोकळ्या जागा तथापी असे करताना सक्षम प्राधिकरणाची मंजुरी असणे आवश्यक आहे.
- फेरीवाला क्षेत्र निर्धारीत करताना महानगरपालिका बेस्ट प्रशासनाकडील लगतच्या दोन पोल मधील अंतराचा विचार करावा. Hindi of lites.
- १ x १ मी. या क्षेत्रामध्ये १ पीच तयार करावे.
- सलग १० पिचेस नंतर १ मी. मोकळी जागा नागरीकांच्या रहदारीकरीया मोकळी ठेवावी. वॉल कंपाऊंड लगतच्या पिचेस असल्यास त्यामध्ये अंतर सोडण्याची आवश्यकता नाही.
- फेरीवाला क्षेत्र प्रस्तावित करताना ज्या पदपथावर कमी वाणीज्य आस्थापना, रहिवाशी संकुल कमी असलेली अशी निवडावीत. less commercial } less residential } make H.Z